
# १. चित्र

## १.१ गिरगिटणे



आम्ही गिरगिटतो, गिरगिटतो ।
चित्र काढणे शिकतो ॥

नका रागवू आम्हां कोणी
चित्र काढणे शिकतो आम्ही ॥


खेळू करू अन् शिकू सारे
कराल कौतुक तुम्ही ॥

आम्ही गिरगिटतो, गिरगिटतो ।
चित्र काढणे शिकतो ॥

## माझी कृती

◆ आवडीप्रमाणे गिरगिटण्यास सांगावे. त्या गिरगिटण्यावर वर्तुळ, त्रिकोण किंवा चौकोन असे बाह्य आकार काढण्यास सांगावे. त्यामधील काही आकार वरीलप्रमाणे रंगवण्यास सांगावे.

- **गिरगिटण्यातून आकारांची निर्मिती.**



- **रंगीत पेन्सिल, रंगीत खडू, रंगीत पेन, स्केच पेन**










- आवडीप्रमाणे गिरगिटण्यास सांगावे. त्यानंतर योग्य ठिकाणी मनानेच ठिपके काढून वरीलप्रमाणे नवीन निर्मिती करून घ्यावी.
- रंगीत पेन्सिल, रंगीत खडू, रंगीत पेन, स्केचपेन किंवा इतर माध्यमांचा उपयोग करून वरीलप्रमाणे गिरगिटून घ्यावे.

## १.२ ठिपक्यांची मजा

**अंकानुसार ठिपके जोडा.**





**हवे तेवढे ठिपके जोडून आकार तयार करा व रंगवा.**






## माझी कृती

- योग्य क्रमानुसार ठिपके जोडण्यास सांगावे. वेगळे चित्र तयार होईल. तो आकार ओळखून त्याचे नाव सांगावे.
- गरजेनुसार ठिपके काढून ते मनाने जोडण्यास सांगावे. नवीन वेगळा आकार तयार होईल त्यामधील काही आकार रंगवून घ्यावेत.

## १.३ गंमत रेषेची




आडवी रेषा　　उभी रेषा　　तिरपी रेषा　　तुटक रेषा　　लयदार रेषा



छेदक रेषा　　अर्धगोलाकार रेषा　　गोलाकार रेषा　　नागमोडी रेषा

### रेषांपासून विविध आकार



## माझी कृती

- काही रेषांचे आकार दिलेले आहेत. त्याप्रमाणे रेषांचा सराव करून घ्यावा. वरीलप्रमाणे रेषांपासून काही आकारांची निर्मिती करता येईल. यापेक्षा वेगवेगळे आकारही मुलांकडून काढून घ्यावेत.


## १.४ ठसेकाम व चिकटकाम


- **पानांचे ठसेकाम**






- **खडबडीत पृष्ठभागाचे छाप**









- **चिकटकाम (कोलाज)**










- वेगवेगळ्या पानांच्या पाठीमागील बाजूस रंग लावून कागदावर ठसेकाम करून घ्यावे.
- पांढऱ्या पातळ कागदाखाली खडबडीत पृष्ठभागाच्या वस्तू ठेवाव्यात. (उदा. किनतान(तरट), झाडाच्या खोडाचा तुकडा इत्यादी.) त्या आकारावर पेन्सिल किंवा तैलखडूने घासून छाप मिळवण्यास सांगावे.
- फळे किंवा फळभाजीचे सोपे आकार काढून रंगीत कागद हातानेच फाडून चिकटकाम(कोलाज) करून घ्यावे.

## १.५ सोपे आकार

- **गोल, त्रिकोण, चौकोन यावर आधारित वस्तूंचे आकार**









- **परिचित वस्तूंचे सोपे आकार**





- **निसर्गातील घटकांचे सोपे आकार पाने, फुले, इत्यादी**



- गोल, त्रिकोण, चौकोन यावर आधारित काही वस्तूंचे आकार वरीलप्रमाणे काढण्यास सांगावे. दिलेल्या आकारापेक्षा वेगवेगळे आकार काढायला सांगावे.
- परिचित वस्तूंच्या आकारांचा सराव करून घ्यावा. वरीलप्रमाणे आकार काढण्यास सांगावे.
- निसर्गातील काही आकारांचे निरीक्षण करून ते आकार काढण्यास सांगावे.

## माझी कृती


### मी काढलेले सोपे आकार

◆ आकारांचा सराव करून घ्यावा व सोपे आकार काढण्यास सांगावे.

## १.६ रंगकाम

- **काही रंगांची ओळख**

| तांबडा | पिवळा | निळा | हिरवा | नारिंगी | जांभळा | पांढरा | काळा |
|---|---|---|---|---|---|---|---|




- **रंग व फुले, फळे यांच्या जोड्या**









## माझी कृती

### रंग भरणे



- ◆ रंगाचे नाव विचारणे.
- ◆ निसर्गामध्ये विविध रंग आहेत. त्यापैकी काही रंगांची ओळख व्हावी यासाठी रंग व वस्तूचा रंग याचे फक्त निरीक्षण करणे अपेक्षित आहे.
- ◆ दिलेल्या चित्रात आवडीप्रमाणे रंग भरण्यास सांगावे.

# १.७ सुलेखन



- अक्षर सुंदर होण्यासाठी लहानपणापासूनच सराव होणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे काही रेषांचा व्यवस्थित सराव करून घ्यावा.

## १.८ माझी चित्रे

◆ वरील जागेत विद्यार्थ्यांना आवडीनुसार चित्रे काढावयास सांगावीत.

CWIAF8